# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ३ रे अंक २४९ वा शुक्रवार दि.०८ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## दिल्लीकरांना २०० युनिटपर्यंत वीज मोफत


नवी दिल्ली : राजधानी दिल्लीत अरविंद केजरीवाल सरकार आल्यापासून गेल्या ९ वर्षांपासून लोकांना वीज बिलात सवलत दिली जात आहे. ही सवलत भविष्यात कायम राहणार की नाही? याबाबत आज दिल्ली मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह मंत्री सौरभ भारद्वाज, आतिशी, इम्रान हुसैन, कैलाश गेहलोत, गोपाल राय आणि राजकुमार आनंद उपस्थित होते.या बैठकीत २०० युनिटपर्यंत मोफत वीज यापुढेही म्हणजेच पुढील वर्षांपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याच धर्तीवर दिल्लीतील लोकांना पूर्वीप्रमाणे ४०० युनिटपर्यंतचे निम्मे बिल भरावे लागणार आहे. या मुद्यावर सरकारने आज तातडीची बैठक बोलावली होती. दरम्यान एक महिन्यापूर्वी, केजरीवाल सरकारने दिल्लीतील लोकांसाठी नवीन सौर धोरण आणले होते, ज्या अंतर्गत सरकार त्यांच्या घराच्या छतावर सौर पॅनेल बसविणा-या लोकांना मोफत वीज देण्याची तयारी करत आहे. सौर धोरण २०२४ बद्दल माहिती देताना मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल म्हणाले होते की उद्योग चालविणा-या लोकांनाही या अंतर्गत फायदा होईल. आपल्या व्यावसायिक युनिट्सवर सौर पॅनल बसवल्यास लोकांचे वीज बिल निम्म्याने कमी होऊ शकते. तसेच, जे आपल्या घराच्या छतावर सौर पॅनेल लावतात,



त्यांना वीज कितीही युनिट वापरली तरी शून्य बिल भरावे लागेल असेही दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. दिल्लीकरांना २०० युनिटपर्यंत वीज मोफत दिल्ली सौर धोरणांतर्गत, केजरीवाल सरकारने पुढील तीन वर्षांत ५०० चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या सर्व सरकारी इमारतींमध्ये सौर पॅनेल बसवणे अनिवार्य करण्याची योजना आखली आहे. यासंदर्भात ऊर्जा मंत्री आतिशी म्हणाल्या होत्या की नवी दिल्ली सौर धोरणाला कॅबिनेटने मंजुरी दिली आहे आणि १० दिवसांच्या आत अधिसूचित केले जाण्याची शक्यता आहे.

## देशी तुपाचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात

नवी दिल्ली : सुप्रीम कोर्टामध्ये नेहमीच मोठमोठ्या खटल्यांची सुनावणी होत असते. मात्र काही खटले असेही असतात, ज्याबाबत ऐकून न्यायमूर्तीच नाही तर सर्वसामान्यही आश्चर्यचकित होतात. असाच एक खटला बुधवारी सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी आला. त्यामध्ये तुपाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. यात याचिकाकर्त्यांनी तूप हे पशुधन नसल्याचा दावा केवा होता. तूप हे गाय आणि म्हशीपासून थेटपणे मिळत नसल्याचा दावा याकिकाकर्त्यांनी केला होता. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, ज्यांच्या दुधामुळे तूप बनते, त्या पशूंचे तूप हे उत्पादन मानले जाईल.सर्वोच्च न्यायालयाने आंध्र प्रदेशच्या कायद्यानुसार तुपाला पशुधन



उत्पादन जाहीर करत राज्य सरकारच्या १९९४ ची अधिसूचनेला कायम ठेवले आहे. त्यामध्ये बाजार समितींना तुपाच्या खरेदी विक्रीवर शुल्क आकारण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. तुपाच्या खरेदी विक्रीवर मार्केटिंग चार्ज लावण्याशी संबंधित प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाला तूप हे आंध्र प्रदेश बाजार अधिनियम १९६६ मधील तरतुदींनुसार पशुधन उत्पादन आहे हे निश्चित करायचे होते.या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि जस्टिस एस.व्ही.एन. भट्टी यांच्या खंडपीठाने सांगितले की, तूप हे पशुधन नाही हा तर्क निराधार आहे. त्याउलट खरंतर तूप हे पशुधन उत्पादन आहे हा तर्क तार्किकदृष्ट्या योग्य आहे. अधिनियमाच्या कलम २(व्ही) अंतर्गत पशुधनाला परिभाषित करण्यात आले आहे. जिथे गाय आणि म्हैस निर्विवादपणे पशुधन आहे.

## ब्लू पँथर संघटनेने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा रेणापुरात उभारावा आ. रमेश आप्पा कराड यांना दिले निवेदन.

लातूर / प्रतिनिधी :- लातूर जिल्ह्याचे ब्ल्यु पँथर संघटनेचे सं.अ.साधुभाऊ गायकवाड यांच्या मार्गदर्शनात डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ता.रेणापुर या ठिकाणी विश्वरत्न प. पू. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा रेनापुर मध्ये भाजपा आमदार रमेश आप्पा कराड यांच्या पुढाकाराने उभारण्यात यावा या मागणीसाठी भाजपा आमदार रमेश अप्पा कराड यांना निवेदन देण्यात आले आहे.



लातूर शहरातील ब्लू पँथर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष साधू भाऊ गायकवाड यांच्या आदेशाने ब्लू पँथर संघटनेचे रेनापुर तालुक्यातील तालुकाध्यक्ष विक्रांत जोगदंड यांच्या अध्यक्षतेखाली लातूरचे भाजपा आमदार रमेशआप्पा कराड यांना ता. रेणापुर येथे संविधान निर्माता विश्वरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा आपल्या पुढाकाराने उभारण्यात यावा या पूर्णाकृती पुतळ्याचे लवकरात लवकर काम चालू करण्यात यावे व रेणापूर तालुक्यातील नागरिकांना अभिवादनासाठी खुला करावा या मागणीसाठी ब्ल्यू पँथर संघटनेचे रेनापुर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी आ.रमेश आप्पा कराड यांना निवेदन दिले. याप्रसंगी ब्लू पँथर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष साधू भाऊ गायकवाड यांच्या आदेशाने रेणापूरचे तालुका उपाध्यक्ष विकास जोगदंड, प्रशांत कांबळे, शहराध्यक्ष दिनेश सावळे, जिल्हा उपाध्यक्ष रवी कांबळे, लखन कांबळे आदींसह ब्लू पँथर संघटनेचे इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'लातूर ग्रामीण'मध्ये विकासाचे चक्र सतत सुरू राहील आमदार धिरज देशमुख यांच्या हस्ते खरोळा येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या नव्या इमारतीचे उद्घाटन





लातूर : महाविकास आघाडी सरकार सत्तेत असताना मिळालेल्या निधीतून रेणापूर तालुक्यातील खरोळा येथे ग्रामपंचायत कार्यालयाची नवी इमारत उभी राहिली असून याचे 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते बुधवारी (ता. ६) उद्घाटन झाले. 'लातूर ग्रामीण'मधील विकासाचे हे चक्र सतत सुरू राहील, असा विश्वास आमदार श्री. धिरज देशमुख यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, गटविकास अधिकारी सुमित जाधव, लातूर लोकसभेचे निरीक्षक अनुप शेळके, रेणा कारखान्याचे उपाध्यक्ष अनंतराव देशमुख, कल्याण बापू मदने, सरपंच धनंजय देशमुख, उपसरपंच बाबन शेख, आर पी पाटील, विश्वास कागले, ग्रामविकास अधिकारी आर व्ही अंकुशवाड, संजय राऊतराव, अनिल गिरी, जगन्नाथ रवळे, सचिन राऊतराव आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते. महाविकास आघाडी सरकार सत्तेत असताना मी पाठपुरावा करून या नव्या इमारतीसाठी निधी मिळवून दिला होता. आज सर्व सुविधांयुक्त भव्य, देखणी व बहुपयोगी अशी ही वास्तू उभी राहिली आहे, याचे समाधान आहे, अशा भावना आमदार श्री. धिरज देशमुख यांनी व्यक्त केल्या. येथील सरपंच आणि ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी गावातील सर्वांना सोबत घेऊन गावात नाविन्यपूर्ण विकासकामे, योजना राबवित आहेत. हे कौतुकास्पद आहे. त्यामुळे खरोळा ग्रामपंचायत विकासाचे मॉडेल गाव बनत आहे, असेही ते म्हणाले.

## भाजप म्हणजे 'वॉशिंग मशिन'

पुणे : लोकसभेच्या तयारीसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार मैदानात उतरले आहेत. लोणावळ्यात शरद पवारांनी कार्यकर्ता मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात बोलताना शरद पवारांनी भाजपवर हल्लाबोल केला आहे. 'भाजप म्हणजे वॉशिंग मशिन, आरोप करा आणि पक्षात प्रवेश देऊन धुऊन काढा, भाजप सत्तेचा गैरवापर करत आहे, अशा शब्दांत त्यांनी भाजपवर हल्लाबोल केला आहे. त्यासोबतच विविध मुद्यांवर त्यांनी भाष्य केले आहे.पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, आदर्श सोसायटी घोटाळ्यात माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा हात आहे, असा आरोप भाजपने केला. सातव्या दिवशी ते भाजपमध्ये गेले आणि पंधराव्या दिवशी ते भाजपचे खासदार झाले. राष्ट्रवादी काँग्रेस म्हणजे भ्रष्टवादी पक्ष म्हणाले. राज्य सहकारी बँक आणि जलसंपदा विभागात घोटाळा केला, असा आरोप मोदींनी केल्यावर मी म्हणालो, हिंमत असेल, तर चौकशी करा. दूध का दूध आणि पानी का पानी होऊ दे, मोदींनी चौकशी करावी. मात्र घडले काय? ज्यांच्यावर आरोप केले आज ते भाजपमध्ये आहेत.




## शिवसेनेच्या ४ जागांवर टांगती तलवार, भाजप ३६ उमेदवार देण्याच्या तयारीत

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणात पडद्यामागे सध्या जोरदार हालचाली घडत आहेत. विशेष म्हणजे जागा वाटपावरुन मित्रपक्षांमध्येच आता धुसफूस सुरु झाली आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी नुकतेच भाजपवर निशाणा साधला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आम्ही ११५ असूनही एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले, असे बोलून दाखवले आहे. दोन्ही नेत्यांची वक्तव्ये थेट माध्यमांसमोर आल्याने पडद्यामागील महायुतीतली अंतर्गत धुसफूस आता चव्हाट्यावर आली आहे. लोकसभेच्या निवडणुका आता तोंडावर आल्या आहेत. पुढच्या ८ ते १५ दिवसांत निवडणूक आयोगाकडून लोकसभा निवडणुकीचा घोषणा होऊ शकते. त्यामुळे जागावाटपावरुन महायुतीत जबरदस्त खलबते सुरु आहेत. भाजप या निवडणुकीत तब्बल ३६ पेक्षा जास्त जागांवर उमेदवार देण्याच्या तयारीत आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. विशेष म्हणजे शिवसेनेच्या ४ जागांवर टांगती तलवार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.यवतमाळ, हिंगोली, उत्तर पश्चिम मुंबई आणि नाशिक या शिवसेनेच्या चार जागेवर टांगती तलवार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यामुळे या जागांवरुन शिवसेना आणि भाजपमधील जागावाटपाचे घोडे अडले आहे. यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघात सध्या शिवसेनेच्या भावना गवळी या खासदार आहेत. पण त्यांच्यावर ईडीचे आरोप असल्याचा दावा भाजपकडून केला जात आहे. उत्तर पश्चिम मुंबई मतदारसंघात गजानन कीर्तिकर खासदार आहेत. इथे भाजपकडून त्यांच्या वयाचा मुद्दा उपस्थित केला जात आहे. नाशिकचे खासदार हेमंत गोडसे यांच्यावर समाज माध्यमांवर आरोप करण्यात आल्याचा दावा केला जात आहे. हिंगोली मतदारसंघात भाजप आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आपल्या पक्षाचा उमेदवार देण्याच्या तयारीत आहे.महायुतीचा नेमका फॉर्म्युला काय? महायुतीच्या जागा वाटपाबाबत सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. जागा वाटपासाठी खलबते देखील घडत आहे. महाराष्ट्रातील भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांची दिल्लीत पक्षाच्या हायकमांडसोबत बैठक पार पडली. या बैठकीत महत्त्वाची चर्चा झाली. भाजप या निवडणुकीत ३६ पेक्षा जास्त उमेदवार देण्याच्या तयारीत आहे. तर शिंदे गटाला ८ ते १० आणि अजित पवार गटाला ३ ते ४ जागा मिळू शकतात, अशी चर्चा आहे. अर्थात या जागावाटपावर अंतिम शिक्कामोर्तब झालेले नाही.

## संपादकीय....

# रोखावी बहुतांची गुपिते..

पारदर्शिता सिद्ध करून दाखवण्याची उत्तम संधी सर्वोच्च न्यायालयाने स्टेट बँकेस दिलेली आहे, ती न साधता केलेल्या दिरंगाईतून उलट बँक नेतृत्वाची चापलूसीच दिसेल आपल्या कोणत्याही शासकीय संस्था जनतेस अपेक्षाभंगाच्या वेदना सहन कराव्या लागू नयेत म्हणून जी खबरदारी घेतात ते पाहून त्यांच्या राजनिष्ठेविषयी कौतुक दाटून यावे. ताजे उदाहरण स्टेट बँक ऑफ इंडिया. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मुदतीत निवडणूक रोख्यांचा तपशील स्टेट बँकेने खरोखरच सादर केला असता तर अनेकांस आश्चर्याचा जबरदस्त धक्का बसला असता. तो धोका आता टळू शकेल. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मुदतीत आवश्यक तो तपशील गोळा करता येणार नाही, किती काम आहे, सबब मुदत वाढवून द्या अशी मागणी ही बँक करणार अशी अटकळ होतीच. ती तंतोतंत खरी ठरली. आपल्याकडे बहुतांश शासकीय यंत्रणांच्या प्रमुखपदावरील व्यक्ती कमीत कमी स्वतंत्र बाणा दाखवतील यासाठी कसून प्रयत्न केले जातात. व्यक्ती जितकी लोटांगणोत्सुक तितके तिचे भवितव्य उज्ज्वल. हे सत्य असल्यामुळे स्टेट बँकेने ही विनंती केलेली असली तरी सरकारचीही तीच इच्छा नसेल असे म्हणता येणार नाही. यावर सर्वोच्च न्यायालय काय तो निर्णय देईलच. पण तो काहीही दिला तरी स्वत: नामानिराळे राहण्याचा मार्ग सरकारला मोकळा आहेच. म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने ही मागणी फेटाळताना समजा चार वाचिक रट्टे स्टेट बँकेला दिले, तर सरकार खाका वर करून 'ही बँकेची मागणी होती, आमचा काय संबंध' असे म्हणू शकते. आणि समजा ही मागणी मान्य झाली तर आतल्या आत विजयाचा आनंद साजरा करू शकते. तथापि सर्वोच्च न्यायालयाचा निकाल काहीही लागला तरी एक गोष्ट अटळ आहे. ते म्हणजे स्टेट बँकेने स्वहस्ते स्वत:च्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगणे. ते कसे हे समजून घेणे मनोरंजक ठरेल.स्टेट बँक ही देशातील सरकारी क्षेत्रातील सर्वात बलाढ्य बँक. या बँकेत साधारण अडीच लाख कर्मचाऱ्यांकडून दररोज साधारण सव्वा कोटीहून अधिक व्यवहार होतात. हे कर्मचारी २२ हजार शाखा आणि दोन–अडीच डझन देशांत विभागलेले आहेत. स्टेट बँक भारतातील काही मोजक्याच अशा बँकांतील एक आहे की जिने पूर्णपणे डिजिटलायझेशन केले आहे. स्टेट बँक म्हणजे काही पेटीएम बँक नव्हे की ज्यातील ग्राहकांचे 'केवायसी' नसल्याचे आढळावे. म्हणजे बँकेत खाते असलेल्या, बँकेशी व्यवहार करणाऱ्या सर्वांचे आवश्यक तपशील, जसे की पॅन कार्ड इत्यादी, बँकेकडे असतातच असतात. त्यामुळे या बँकेची बरोबरी नेहमी केली जाते ती कार्यक्षमतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या खासगी बँकांशी. तेव्हा इतक्या तगड्या, कार्यक्षम, सर्व व्यवहार नियमाधारित असणाऱ्या बँकेस तपशील शोधून शोधावयाचा आहे तो किती? तर फक्त ४४ हजार ४३४ नोंदी इतकाच. खुद्द बँकेतर्फेच ही माहिती देण्यात आलेली आहे. स्टेट बँकेच्या शाखांतून विविध प्रसंगी निवडणूक रोखे खरेदी करणाऱ्यांची संख्या ४४ हजार ४३४ इतकी आहे. या इतक्या जणांनी आपले पॅन क्रमांक, आधार इत्यादी सादर करून स्टेट बँकेकडून हे रोखे विकत घेतले आणि त्यांना हव्या त्या राजकीय पक्षांकडे ते सुपूर्द केले. आता यात सर्वाधिक रोखे भारतीय जनता पक्षाला मिळाले आणि तोच पक्ष सध्या सत्तेवर आहे हा केवळ योगायोगच म्हणायचा तसा. हा जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष. तेव्हा या बलाढ्य आदी पक्षाला देणग्याही सर्वाधिक मिळणार, हे ओघाने आलेच. ही 'ओघातील' बाब खरे तर स्टेट बँकेने उघडपणे मान्य करण्यास काहीच हरकत नाही. जो सर्वात बलदंड असतो त्याचा खुराकही अधिक असणार. तेव्हा भाजपला सर्वाधिक देणग्या मिळाल्या असतील तर स्टेट बँकेने ओशाळे व्हावयाचे आणि हा तपशील आपणास जमा करण्यास वेळ लागेल असे म्हणण्याचे काहीच कारण नाही. त्यातही इतके जगड्व्याळ व्यवहार हाताळणाऱ्या स्टेट बँकेस अवघ्या ४४ हजार ४३४ जणांचा तपशील जमा करायला साधारण १२० दिवसांचा अवधी हवा? हीच जर बँकेची कार्यक्षमता असेल तर स्टेट बँकेपेक्षा एखाद्या बुद्रुक गावातली सहकारी बँक बरी म्हणता येईल. याचा साधा अर्थ असा की प्रश्न स्टेट बँकेच्या कार्यक्षमतेचा नाही.तर तिच्या इच्छेचा आहे आणि ही इच्छा सरकारच्या इच्छेशी निगडित नाही, असे ठामपणे म्हणता येणार नाही. हे लक्षात घेतल्यास स्टेट बँकेच्या हेतूविषयीच संशय घेतला जायला हवा. दुसरी शक्यता अशी की बँक म्हणते त्याप्रमाणे ही खातेदारांची संख्या ४४ हजार वा अधिक असणार नाही. याचे कारण असे की यातील बरेचसे रोखे १ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचे आहेत. गेल्या सहा वर्षांत या रोख्यांतून १६ हजार कोटी रु. जमा झाले. हे सर्व एक–एक कोटी रुपयांच्या रकमेचे होते असे जरी गृहीत धरले तरी या रोख्यांचा तपशील हा १६ हजारांपुरताच मर्यादित राहतो. देशातील इतक्या बलाढ्य बँकेस १६–१७ हजार रोख्यांचा तपशील जमा करून सादर करायला तीन–चार महिने लागावेत? सर्वोच्च न्यायालयाने हे रोखे रद्दबातल ठरवण्याचा निर्णय दिला १५ फेब्रुवारी रोजी. त्याच वेळी या रोख्यांचा तपशील सादर करण्याची कार्यक्रमपत्रिकाही सर्वोच्च न्यायालयाने सादर केली. म्हणजे आपणास हे सर्व कधी उघड करावयाचे आहे हे स्टेट बँकेस त्याच दिवशी स्पष्ट झाले. तरीही मुदतवाढीची मागणी करण्यासाठी स्टेट बँकेस निकालानंतर तीन आठवडे लागावेत? मग या तीन आठवड्यांत स्टेट बँक काय करत होती? रोख्यांचा किती तपशील या काळात बँक जमा करू शकली? याची उत्तरे सर्वोच्च न्यायालयाने बँकेस खडसावून मागवायला हवीत. कारण ही मुदत संपत येत असताना स्टेट बँक मुदतवाढीची मागणी करून सर्वोच्च न्यायालयास अडचणीत आणू पाहते. सर्वोच्च न्यायालयाने जी काही मुदत दिली त्यापेक्षा काही आठवडे, एखादा महिना अधिक वेळ मागून घेणे एक वेळ समजून घेता आले असते. पण मुदतवाढ हवी ती थेट ३० जूनपर्यंत? विद्यमान लोकसभेची मुदत १६ जूनला संपेल. म्हणजे नवीन लोकसभा अस्तित्वात आल्यावर विसर्जित लोकसभा निवडणुकीचा तपशील स्टेट बँक देणार? त्यापेक्षा सरळ निवडणुका होईपर्यंत आम्ही हा तपशील देऊ इच्छित नाही, कारण सरकारची तशी इच्छा आहे असे प्रामाणिकपणे सांगण्याची हिंमत जर स्टेट बँकेने दाखवली असती तर तीविषयी काही बरे बोलता आले असते. आता तसेही काही नाही.

# 'बायजू'चा धडा

एकेकाळी देशातील किंबहुना कदाचित जगातील सर्वांत मोठी ॲडटेक युनिकॉर्न कंपनी म्हणून 'बायजू'ची खूप मोठ्या प्रमाणावर चर्चा सबंध उद्योगविश्वात झाली. परंतु, आज ही कंपनी आपल्या अस्तित्वासाठी लढताना दिसत आहे. आता लुकआऊट सर्क्युलर जारी केल्यानंतर या कंपनीचे सर्वेसर्वा असणारे रवींद्रन देशाबाहेर जाऊ शकत नाहीत. या कंपनीची दुरवस्था ही स्टार्टअप विश्वातील नवतरुणांसह एकंदरीतच उद्योगविश्वासाठी एक मोठा धडा आहे. बायजूने ब्रँड तयार करण्यासाठी खूप पैसा गुंतवला. इंडियन प्रीमियर लीग आणि फुटबॉल विश्वचषक प्रायोजित केले. यामुळे कंपनीचे नाव घराघरांत पोहोचले. परंतु या प्रसिद्धीमुळे अर्थकारणाचा पाया कोलमडला. आता कंपनीच्या संचालकांना कर्मचा–यांचे पगार देण्यासाठी स्वत:ची आणि कुटुंबाची संपत्ती गहाण ठेवावी लागली आहे. बायजूच्या पतनामुळे ॲडटेक क्षेत्रातील गुंतवणूकदारांकडून दीर्घकाळ निधी मिळणे कठीण झाले आहे.द्यमान केंद्र सरकारने स्टार्ट अप इंडिया या महत्त्वाकांक्षी मोहिमेचा श्रीगणेशा करण्यामागे देशातील प्रतिभावंत नवतरुणांना नवसंकल्पनांवर आधारित तंत्रज्ञानाच्या साथीने नवउद्योग स्थापन करता यावेत आणि त्यातून देशातील तरुणपिढी रोजगारक्षमच नव्हे तर रोजगारनिर्मिती करणारी ठरावी असा हेतू होता. या योजनेमुळे देशामध्ये मोठ्या प्रमाणावर स्टार्टअप्सचे जाळे उभे राहिले. विशेषत: कोविड काळात स्मार्ट तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अनेक स्टार्टअप उदयास आले. त्यातून स्टार्टअप्सची एक परिसंस्था तयार झाली. जर कोणत्याही स्टार्टअपचे मूल्य १ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचले तर त्याला युनिकॉर्न म्हणतात आणि एखाद्या स्टार्टअपचे मूल्य १० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचले तर त्याला डेकाकॉर्न म्हणतात. स्टार्टअप्सच्या विश्वातील बहुचर्चित ॲडटेक कंपनी असणारी बायजू ही भारतातील पाच डेकाकॉर्न स्टार्टअपपैकी एक म्हणून ओळखली जात होती.बायजू रवींद्रन हे या कंपनीचे संस्थापक आणि सीईओ आहेत. कन्नूरच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.टेक केलेले आणि इंग्लंडमध्ये नोकरी करणारे बायजू हे आयआयएमची एंट्रन्स टेस्ट १०० पर्सें टाईलने दोनदा उत्तीर्ण झाले आहेत. मूळचे केरळमधील असणा–या रवींद्रन यांनी गणित आणि विज्ञान या विषयांचे ऑनलाईन शिक्षण देण्यास सुरुवात केली. या उपक्रमाला तुफान प्रतिसाद मिळाला. ऑनलाईन प्रवेशाची तयारी करणा–या रवींद्रन यांनी ही संकल्पना पुढे नेत थिंक अँड लर्न या नावाने स्टार्टअप सुरू केले. दोन वर्षे कठोर परिश्रम केल्यानंतर २०१३ मध्ये त्यांना पहिला निधी मिळाला. त्यानंतर त्यांनी २०१५ मध्ये 'बायजू' नावाने एक ॲप डिजिटल विश्वात आणले. साधारणत: २–३ महिन्यांत २० लाख लोकांनी हे ॲप डाऊनलोड केले. पाहता पाहता या कंपनीची लोकप्रियता वाढत गेली. ती इतकी की, हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये बायजूचा केसस्टडीसुद्धा शिकवला जाऊ लागला.२०१७ मध्ये, 'बायजू'ने बॉलिवूडचा बादशहा अभिनेता शाहरूख खान याला आपल्या कंपनीचा ब्रँड ॲम्बेसेडर बनवले आणि २०१८ मध्ये कंपनीचे मूल्यांकन १ अब्ज पार गेल्यामुळे 'बायजू' हे एक युनिकॉर्न स्टार्टअप बनले. यानंतरच्या काळातही कंपनीला फंडिंग मिळत राहिले. २०१९ मध्ये 'बायजू' भारतीय क्रिकेट संघाचा प्रायोजक बनला. भारतीय क्रिकेट संघाच्या खेळाडूंच्या जर्सीवर या कंपनीचा लोगो झळकू लागला. २०२० मध्ये आलेल्या कोविड महामारीमुळे ऑनलाईन विश्वातील 'बायजू'ला संधींचे अवकाश निर्माण करून दिले. लॉकडाऊनमध्ये घराबाहेर पडू न शकलेल्या मुलांनी या कंपनीचे पॅकेज विकत घेतले. त्यानंतर रवींद्रन यांनी वैद्यकीय आणि आयआयटी प्रवेशाची तयारी देणारे आकाश कोचिंगही सुमारे ७३०० कोटी रुपयांना विकत घेतले. २०२२ मध्ये, या कंपनीने फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीला त्यांचा जागतिक ब्रँड ॲम्बेसेडर बनवले आणि कतार येथे झालेल्या फिफा विश्वचषकाची 'बायजू' प्रायोजक बनली. याखेरीज अनेक कंपन्यांचे अधिग्रहणही रवींद्रन यांच्या या कंपनीने केले.परकीय गुंतवणूकदारांकडून मिळालेल्या पैशांमुळे असे सौदे सुलभ झाले. ब्लॅकरॉक, सिल्व्हर लेक, टायगर ग्लोबल यांसारख्या परदेशी गुंतवणूकदारांकडून रवींद्रन यांनी चांगली रक्कम जमा केली. बायजूच्या वाढीच्या धोरणाने विदेशी गुंतवणूकदार प्रभावित झाले. त्यांच्याकडून या कंपनीने सुमारे ५० हजार कोटी रुपये गोळा केले. या फंडिंग फे–यांमुळे बायजूचे मूल्यांकन वाढतच गेले. 'बायजू' भारताच्या स्टार्टअप इकोसिस्टमचा पोस्टर बॉय बनली. त्याचे प्रवर्तक रवींद्रन यांना एकापाठोपाठ एक 'आंत्रप्रेन्योर ऑफ द इयर' पुरस्कार मिळाले. अर्थातच यासाठी कंपनीने मार्केटिंगवर प्रचंड खर्च केला. पण बायजूला ही चमक जास्त काळ टिकवता आली नाही. कर्ज आणि निधीद्वारे जलद गतीने केलेल्या अधिग्रहणांमुळे नफा मिळू शकला नाही. दरम्यानच्या काळात, या युनिकॉर्न कंपनीवर अनेक आरोपही झाले. कोर्टकचे–या झाल्या. त्यामुळे रवींद्रन यांना आपली रणनीती बदलावी लागली. पण त्यानंतर कंपनीला तोटा होऊ लागला. दुसरीकडे, कोविडोत्तर काळात मुले ऑनलाईन शिकण्याऐवजी ऑफलाईन अभ्यास करण्यासाठी कोचिंग सेंटरमध्ये जाऊ लागली. परिणामी, 'बायजू'मधून २५ हजारांहून अधिक कर्मचा–यांना काढून टाकण्यात आले. परदेशात विस्तार करण्यासाठी या कंपनीने कर्जही घेतले होते. त्याची परतफेड करण्यात अडचणी येऊ लागल्या. यादरम्यान, कंपनीतील अनेक वरिष्ठ अधिका–यांनी राजीनामे दिले.त्यांचे ऑडिटर डेलॉईट यांनीही कंपनीच्या आर्थिक स्थितीबद्दल चिंता व्यक्त करत नोकरी सोडली. कंपनी आपले आर्थिक रेकॉर्ड देत नसल्याचा ठपका त्यांनी ठेवला. २०२३ मध्ये, विदेशी चलन व्यवस्थापन कायद्याचे उल्लंघन केल्याच्या आरोपावरून ईडीने बायजूच्या कार्यालयावर आणि रवींद्रन यांच्या घरावर छापे टाकले. जवळपास ९ हजार कोटींहून अधिक रकमेबाबत ईडीने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली. संकटांची मालिका सुरू झाल्याबरोबर गुंतवणूकदारांनी दबाव आणण्यास सुरुवात केली. कर्जदात्यांचा तगादा सुरू झाला. कंपनी वादात सापडल्यामुळे मूल्यांकन खाली येऊ लागले. सद्यस्थितीत ब्लॅकरॉकने या कंपनीचे मूल्य १ अब्जापर्यंत कमी केले आहे. दुसरीकडे, कंपनीच्या गुंतवणूकदारांनी एक विलक्षण सर्वसाधारण सभा घेतली आणि बीजू रवींद्रन यांना सीईओ पदावरून हटवण्याचा निर्णय घेतला आहे. भारतातील एका तथाकथित प्रथितयश स्टार्टअपची अशी शोकांतिका होण्यामागे आर्थिक व्यवस्थापनातील अपयश कारणीभूत आहेत. कोविडनंतर शाळा उघडल्या गेल्या तेव्हा ऑनलाईन शैक्षणिक उत्पादनांची मागणी कमी झाल्यामुळे बायजू आणि त्यांच्या गुंतवणूकदारांच्या गगनाला भिडलेल्या अपेक्षांना मोठा धक्का बसला. वास्तविक, बदललेल्या वातावरणानुसार तुम्ही तुमच्या उत्पादनात बदल करणे गरजेचे असते.शैक्षणिक ब्रँड्सना एक ठोस ओळख विकसित करण्यासाठी अनेक दशके लागतात. पण बायजूने प्रसिद्धी आणि मार्केटिंग, ब्रँडिंगवर कमालीचा पैसा खर्च करून काही वर्षांतच ही ओळख मिळवली. परंतु प्रत्यक्षात कोणतीही संस्था, कंपनी दीर्घकाळ सुरू राहण्यासाठी नफ्याचे अर्थकारण महत्त्वाचे असते. त्याबाबत रवींद्रन हे सपशेल अनुत्तीर्ण झाल्याचे दिसत आहे. कंपनीच्या वाढत्या प्रसिद्धीमुळे गुंतवणूकदार एकामागून एक पैसे गुंतवत राहिले आणि प्रत्येक फंडिंग फेरीत बायजूची किंमत वाढत गेली. वाढत्या मूल्यांकनाचे ढोल पिटून गुंतवणूकदार पुढील गुंतवणूकदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत होते. जोपर्यंत फुगा वाढत होता तोपर्यंत सर्वजण आनंदी होते. पण त्याला टाचणी लागल्यानंतर सर्वच पितळ उघडे पडले. सध्या बायजू खोल आर्थिक संकटाचा सामना करत आहे आणि ईडीच्या छाप्यांचा सामना करत आहे. कंपनीच्या मालकाला आपल्या कर्मचा–यांना पगार देण्यासाठी आपले घर विकावे लागले आहे. त्यांच्या विरोधात लुकआऊट नोटीस जारी करण्यात आली आहे, म्हणजे तो देशाबाहेर जाऊ शकत नाहीत. नुकताच एक व्हीडीओ समोर आला आहे, ज्यात एका मुलाचे वडील परतावा घेण्यासाठी आले होते, जेव्हा त्यांना परतावा मिळाला नाही तेव्हा त्यांनी कायदा हातात घेतला आणि बायजूच्या ऑफिसमधून टीव्ही काढला आणि निघून गेला. बायजूला आर्थिक नोंदीही वेळेवर सादर करता आल्या नाहीत. बायजूचे प्रकरण कॉर्पोरेट गव्हर्नन्सच्या मानकांशीही संबंधित आहे. जर कंपनीने गुंतवणूकदारांकडून पैसे उभे केले तर त्या पैशाचे ती काय करत आहे हे सांगायला हवे होते. पण आर्थिक वर्ष २०२१ नंतरची हिशेबपुस्तके 'बायजू'ने सादर केलेली नाहीत, अशी परिस्थिती आहे. बडे विदेशी गुंतवणूकदारही यावर बराच काळ मौन बाळगून राहिले, ही बाब आश्चर्यकारक आहे. आता या नोंदी लवकरच समोर येतील, असे रवींद्रन सांगत आहेत; पण त्यामुळे गेलेली पत परत मिळणार का हा खरा प्रश्न आहे. तसेच या कंपनीमध्ये पैसे गुंतवलेल्या गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले आहे. हजारो कर्मचा–यांच्या नोक–या गेल्या आहेत आणि अनेकांच्या नोक–या धोक्यात आल्या आहेत. ज्या मुलांनी बायजूचे अभ्यासक्रम घेतले आहेत त्यांनाही समस्या येऊ शकतात. सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बायजूच्या पतनाचा प्रतिकूल परिणाम भारतातील इतर स्टार्टअपवरही होऊ शकतो. विशेषत: त्यांना निधीउभारणीत अडचणी येऊ शकतात.

# सुशिक्षित महिलांचा अज्ञानी महिला दिन !.

आपल्या देशात आपल्या मातृभूमीत जन्मलेल्या लोकांचे फारसी दखल घेतली जात नाही.पण सातासमुद्रापार कोणी काही केले असेल तर त्याला जागतिक महत्व असते.त्यामुळेच देशात प्रत्येक वेळा जागतिक दिन मानले जातात व ते उस्त्पुर्तपणे साजरे केले जातात. भारत हा कृषीप्रधान देश आहे त्यात महिलांचे प्रमाण पुरुषा बरोबर ८५/९० टक्क्या पर्यंत आहे.महिला वर्ग हा सर्वात अज्ञानी,असुशिक्षित,असंघटीत होता आणि आज ही आहे.मुठभर महिला सुशिक्षित उच्चशिक्षित सुद्धा आहेत. त्या दरवर्षी महिलादिन आठ मार्चला साजरा करतात.पण ९० टक्के महिलांना आठ मार्च महिला दिन का साजरा करतात.ते सांगता येत नाही. जगातील महिला एकत्र येऊन त्यांनी मोठा संघर्ष केला म्हणून आठ मार्च जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो असे म्हणतात. पण त्या कोण महिला होत्या त्यांनी कोणा बरोबर संघर्ष केला. जातीव्यवस्थे विरोधात त्या लढल्या काय?.शिक्षण घेण्या करिता लढल्या काय?. त्याकाळी त्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता काय?. मग त्यांनी डायरेक मतदानाचा अधिकार कसा काय मागितला?.भारतात तो जगाचा जागतिक महिला दिन का पाळला जातो.भारतातील महिलाच्या आणि जगातील त्या महिलांचे समस्या समान होत्या काय?.या देशात सात च्या आत महिला घरात पाहिजे शिक्षणात,संपतीत,मालमतेत,आर्थिकदृष्ट्या तिला आजही किती अधिकार आहेत.हे त्या महिला दिना निमित्य कोणी किती ऐतिहासिक कार्य केले.भारतातील बहुसंख्य असंघटीत महिलांना आठ मार्च महिला दिन कशाचा समजले पाहिजे.पण तसे न होता दरवर्षी सुशिक्षित महिलांचा अज्ञानी महिला दिन साजरा होतो.



भारतात महिला दिनाची सुरुवात मुंबई येथे ८ मार्च १९४३ रोजी पहिला महिला दिन साजरा करून झाली. त्यानंतर ८ मार्च १९७१ ला पुण्यातील काही संघटना नी मोर्चा काढला.त्यानंतर १९७५ ला युनोने जागतिक महिला वर्ष म्हणून जाहीर केले. त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजा समोर येत गेल्या. स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली. स्त्रिया बोलत्या व्हायला लागल्या. बदलत्या सामाजिक,आर्थिक,राजकीय,सांस्कृतिक परिस्थिती नुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. आता बँका,रेल्वे सरकारी,निमसरकारी कार्यालये तसेच काही राजकीय घरा मधूनही ८ मार्च महिला दिन साजरा व्हायला लागला.

भारतात ज्या महिलेने पहिले स्वत शिक्षण घेऊन मुलीना शिक्षण देण्यासाठी पाहिली शाळा काढली. ती १ मे १८४७ रोजी.सावित्रीबाई फुले (जन्म ३ जानेवारी १८३१,जन्म स्थळ–नायगाव,सातारा–मृत्यू– १० मार्च १८९७ पुणे येथे झाला.) त्या पहिल्या महिला शिक्षिका,शिक्षण प्रसारक,समाज सुधारक महिला होत्या.महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाची सुरुवात महात्मा ज्योतीराव फुले यांनी आपल्या पत्नीला शिक्षण देऊन केली. तो खरा महिला दिन किंवा महिला शिक्षण दिन असायला पाहिजे होता.पण.....हळदकुंकू,मंगल गौरी साजरा करणाऱ्याचा महिला दिन मोठ्या उत्स्पुर्तपणे साजरा होतांना दिसत आहे.म्हणूनच लिहतो सुशिक्षित महिलांचा अज्ञानी महिला दिन !.

संपूर्ण अमेरिका आणि युरोपसहित जवळ जवळ जगभरच्या स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता. हे सांगितल्या जाते पण त्यांना शिक्षणाचा अधिकार होता काय हे सांगितल्या जात नाही.पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्री–पुरुष विषमतेचे हे एक ढळढळीत उदाहरण देण्यात येते. या अन्याया विरुद्ध स्त्रिया (कोणत्या) आपापल्या परीने संघर्ष करीत होत्या. १८९० मध्ये अमेरिकेत मतदानाच्या हक्का संदर्भात द नॅशनल अमेरिकन सफ्रेजिस्ट असोसिएशन स्थापन झाली.परंतु ही असोसिएशन सुद्धा वर्णद्वेषी आणि स्थालांतरीत पूर्वग्रह असणारी होती. दक्षिणेकडील देशांना काळया मतदात्यां पासून आणि उत्तर व पूर्वेकडील देशांना तेथील बहुसंख्य देशांतरीत मतदात्यां पासून वाचवण्याकरता स्त्रियांना मतदानाच्या हक्क मिळायलाच हवा, अशा प्रकारचे आवाहन ती करत होती. अर्थात या मर्यादित हक्कांना बहुसंख्य काळया वर्णाच्या आणि देशांतरित कामगार स्त्रियांनी जोरदार विरोध केला आणि क्रांतिकारी मार्क्सवाद्यांनी केलेल्या सार्वत्रिक प्रौढ मतदानाच्या हक्कांच्या मागणीला पाठिंबा दिला. १९०७ साली स्टुटगार्ड येथे पहिली आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषद भरली.त्यामध्ये क्लारा झेटकिन या अतिशय लढाऊ बाण्याच्या, झुंजार कम्युनिस्ट कार्यकर्तीने सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळवण्या साठी संघर्ष करणे हे समाजवादी स्त्रियांचे कर्तव्य आहे. अशी घोषणा केली.

८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री–कामगारांनी रुटगर्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता ह्या मागण्या केल्या. या दोन मागण्यां बरोबरच लिंग,वर्ण,मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमी निरपेक्ष सर्व प्रौढ स्त्री–पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशी मागणीही जोरकसपणे केली. अमेरिकन कामगार स्त्रियांच्या या व्यापक कृतीने क्लारा झेटकिन अतिशय प्रभावित झाली.१९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत, ८ मार्च १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री–कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ, ८ मार्च हा जागतिक महिला–दिन म्हणून स्वीकारावा असा जो ठराव क्लाराने मांडला, तो प्रसार झाला. यानंतर युरोप, अमेरिका वगैरे देशात सार्वत्रिक मतदानाच्या हक्कासाठी मोहिमा उघडल्या गेल्या. त्यांचा परिणाम म्हणून १९१८ साली इंग्लंडमध्ये व १९१९ साली अमेरिकेत या मागण्यांना यश मिळाले. तो महिला दिन डावे समाजवादी पुरोगामी भारतात साजरा करतात.त्यांना भारतातील १८३१ ला जन्मलेली आणि १८४७ ला मुली करिता म्हणजे महिला करिता पहिली शाळा काढलेली सावित्रीबाई फुलेचे कार्य आणि कर्तुत्व दिसत नाही. ज्या महिला आणि शिक्षणसंस्था सरस्वती शिक्षणाची देवी मानतात त्याच महिला आठ मार्च महिला दिन मोठ्या उत्साहाने साजरा करतात.हाच सुशिक्षित महिलांचा अज्ञानी महिला दिन असतो.

त्याच बरोबर ८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री–कामगारांनी रुटगर्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता ह्या मागण्या केल्या. या दोन मागण्यां बरोबरच लिंग,वर्ण,मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमी निरपेक्ष सर्व प्रौढ स्त्री–पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशी मागनीने अमेरिका न्यूयार्क हालविला सांगितल्या जाते. तेच काम भारतातील मुंबईच्या असंघटीत गिरणी कामगाराना संघटीत करण्याचे काम महात्मा ज्योतीराव फुले यांचे शिष्य रावबहादूर नारायण मेघांजी लोखंडे यांनी १८६० ते १८९० पर्यंत केल. त्याची नोंद मात्र डावे समाजवादी पुरोगामी घेत नाही.रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे यांनी सप्टेंबर १८८४ मध्ये मुंबई येथे पहिली मोठी कामगार परिषद भरवून कारखाना आयोगाकडे ५,५०० कामगारांचे लेखी निवेदन पाठविले. त्यात दर रविवारी पगारी सुटी, दररोज नियमित कामाच्या १४ तासांऐवजी आठ तास, मुलांचे नोकरीचे वय ७ वर्षांवरून ९ वर्षे करावे, दर महिन्याच्या १५ तारखेच्या आत वेतन मिळावे,कामगाराला दुखापत झाल्यास पगारी रजा मिळावी, तसेच फार मोठी शारीरिक इजा होऊन कामगार कामासाठी अपात्र ठरल्यास त्याच्या भावी जीवनासाठी आर्थिक तरतूद केली जावी. इत्यादी. मागण्यांचा समावेश करण्यात आला होता. या मागण्यांचे निवेदन कलकत्त्यास गव्हर्नर जनरलकडेही पाठविण्यात आले होते (१८८९).रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे यांनी १८९० मध्ये मुंबई गिरणी कामगार संघ (बॉम्बे मिलहँड्स असोसिएशन) नावाची भारतातील पहिली कामगार संघटना स्थापिली. एप्रिल १८९० मध्ये दहा हजार स्त्री–पुरुष कामगारांची मोठी परिषद रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे यांनी मुंबईत भरविली. या परिषदेत स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. मुंबईतील औद्योगिक संघटनांच्या चळवळीतील ही महत्त्वाची घटना समजली जाते. त्यानंतर लगेचच १० जून,१८९० रोजी शासनाने,कामगारांना दर रविवारी पगारी सुटी देण्याचा निर्णय जाहीर केला. १८९० मध्ये कामगार कायदा संमत करण्यात येऊन लोखंडे यांच्या काही सूचनांचा त्यात समावेश करण्यात आला. सरकारने त्यांच्या कामगिरीची दखल देऊन त्यांना 'जे.पी.' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. हा इतिहास महिला दिन साजरा करणारे का विसरतात?. फुले लोखंडे याचे कार्या पेक्षा जात महत्वाची वाटते म्हणून का???.

भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीच्या महिला नेत्यांना आणि त्याच्या आदर्श नेत्यांना भारतातील सावित्रीबाई ज्योतीराव फुले डोळ्या समोर ठेऊन महिला दिन साजरा करावा असे का वाटत नाही.कारण काल त्या होत्या म्हणून तुम्ही आज सन्मानाने या ठिकाणी आहेत भारतातील सावित्रीमाई फुले कुठे कमी पडतात. ते भारतातील महिला दिनाचे गोडवे गाणाऱ्या महिला पत्रकार,थोर विचारवंत,महिला साहित्यिक, लढाऊ महिला नेत्या आणि सुशिक्षित सुरक्षित नोकरी करणाऱ्या महिलांनी जाहीर पणे सांगावे.महिला दिन जरूर साजरा करा पण त्या भारतातील राष्ट्रमाता जिजाऊ,अहिल्याबाई होळकर,ताराराणी,सावित्रीबाई फुले,भिमाबाई,माता रमाई,इंदिरा,प्रतिभाताई, मायावती,जयललिता,ममता,ज्यांनी जीवनात खऱ्या अर्थाने संघर्ष करून इतिहास घडविला त्यांच्या आई बापाचे नांव गांव,तालुका,जिल्हा,राज्य माहित होते आणि आहे.त्या महिलांचा आदर्श आजच्या सुशिक्षित महिलांनी घेऊन महिला दिन साजरा करावा हीच अपेक्षा.शेवटी मान्य नसलेल्या व मनुवादी विचारांच्या राजकीय लोकांनी लादलेल्या महिला दिन. सुशिक्षित महिलांच्या अज्ञानी महिला दिनाला सुद्धा हार्दिक शुभेच्छा. धन्यवाद!.

****************

**आपल**

**सागर रामभाऊ तायडे. ९९२०४०३८५९,भांडुप,मुंबई**
**अध्यक्ष सत्यशोधक कामगार संघटना,स्वतंत्र मजदूर युनियन,महाराष्ट्र राज्य,**

## महिलांनी संकटांना न डगमगता यशस्वी वाटचाल करावी : यन्नम




सोलापूर – महिलांनी कोणत्याही संकटांना न घाबरता त्यावर मात करीत यशस्वी वाटचाल करावी. कोणत्याही परिस्थितीत उज्वल यश संपादन करावे, असे आवाहन माजी महापौर श्रीकांचना यन्नम यांनी केले.लायन्स क्लब ऑफ सोलापूर क्लासिक तसेच सुप्रभात शिक्षण मंडळ संचलित बालभारती विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सत्कारमूर्ती म्हणून त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रभात शिक्षण मंडळ संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अख्तरबानो शेख होत्या. प्रमुख अतिथी म्हणून लायन्स क्लब ऑफ सोलापूर क्लासिक चे अध्यक्ष शब्बीर शेख ,बालभारती प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रिजवान शेख ,बालभारती माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक इम्तियाज मुल्ला उपस्थित होते. यावेळी उल्लेखनीय काम करणाऱ्या माजी महापौर यन्नम, डॉ. सुषमा संभारंभ , मुख्याध्यापिका जि प प्राथमिक शाळा विडी घरकुल फिरोजा इरकल , डॉ. लक्ष्मी बळी , पोलीस कर्मचारी दिपाली बोरामणीकर , पहिली महिला रिक्षा चालक शोभा घंटे आदींचा यावेळी सन्मान करण्यात आला.यन्नम यांनी मुलींनी शिकावे आणि पुढे जावे असे आवाहन केले. अतिथी लायन्स क्लबचे अध्यक्ष शब्बीर शेख यांनी प्रत्येक क्षेत्रात मुली पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत व आपली जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन अनिस शेख यांनी केले तर आभार रिजवान शेख यांनी मानले.

# खाणाऱ्यांना रक्ताच्या उलट्या का झाल्या? डॉक्टरांनी केला खुलासा

: नुकत्याच घडलेल्या एका धक्कादायक घटनेत गुरुग्राम येथील एका रेस्टॉरंटमध्ये काही ग्राहकांना जेवणानंतर माऊथ फ्रेशनरऐवजी चुकून ड्राय देण्यात आला, ज्यामुळे त्यांना रक्ताच्या उलट्या झाल्या. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण नुसार ड्राय आईस हा प्राणघातक पदार्थ असल्याचे सांगितले जाते. अगदी युनायटेड स्टेट्स फूड अँड ड्रग डमिनिस्ट्रेशन , तसेच रोग नियंत्रण आणि प्रतिबंध केंद्राद्वारे, ड्राय आईसला थेट हातांनी स्पर्श न करण्याचा सल्ला दिला जातो. नेहमी अतिशय थंड तापमान आणि सुरक्षिततेसाठी डिझाइन केलेले हातमोजे आणि गॉगलचा वापर करण्याचा सल्ला दिला जातो.ड्राय आईस म्हणजे काय? ड्राय आईस हा अत्यंत कमी तापमानातील घन अवस्थेतील कार्बन डाय ऑक्साइड असतो, ज्याचे तापमान सुमारे –७८.५ अंश सेल्सिअस (–१०९.३ अंश फॅरेनहाइट) इतके असते. गुणधर्मामुळे ड्राय आईसचे घन अवस्थेतून थेट वायू अवस्थेमध्ये रुपांतर होते. पाण्याच्या बर्फाप्रमाणे त्याचे द्रवामध्ये रुपांतर होत नाही. ड्राय आईसचा वापर सहसा पदार्थ गोठवण्यासाठी आणि थंड करण्यासाठी वापरले जाते, असे दिल्लीतील सीके बिर्ला हॉस्पिटलचे (आर), अंतर्गत औषध विभागाचे संचालक, डॉ. राजीव गुप्ता यांनी 'द इंडियन एक्स्प्रेस'ला माहिती देताना सांगितले.ड्राय आईस संबंधित आरोग्य धोके काय आहेत? जिंदाल नेचरक्योर इन्स्टिट्यूटच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. बाबिना एनएम यांनी 'द इंडियन एक्स्प्रेस'ला माहिती देताना सांगितले की, रेस्टॉरंट्स आणि बारमध्ये ठराविक पदार्थ थंड ठेवण्यासाठी ड्राय आईसचा वापर केला जातो. अनेकदा ग्राहकांना भुरळ पाडण्यासाठी काही खाद्यपदार्थ सर्व्ह करताना, वाफ सदृष्य आभास निर्माण करण्यासाठी ड्राय आईसचा वापर केला जातो. ड्राय आईस जरी कुलिंग एजंट म्हणून चांगले काम करत असले तरी ते वापरताना सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. ड्राय आईसमधील कार्बन डाय ऑक्साइड वायू आणि अत्यंत थंड तापमानामुळे तो अयोग्यरित्या हाताळल्यास श्वसनाच्या समस्या किंवा त्वचेला दुखापत होऊ शकते.डॉ. गुप्ता यांच्या मते, जेव्हा ड्राय आईस त्वचेच्या संपर्कात येतो, तेव्हा त्याच्या कमी तापमानामुळे फ्रॉस्टबाइट किंवा कोल्ड बर्न्स होऊ शकतात. आरोग्यावरील परिणामांच्या बाबतीत, ड्राय आईसची मुख्य चिंता कार्बन डाय ऑक्साइड वायू सोडणे ही आहे. जेव्हा ड्राय आईस घन स्वरुपातून वायूमध्ये रुपांतरीत होतो, तेव्हा तो कार्बन डाय ऑक्साइडमध्ये बदलतो. बंदिस्त जागा, जिथे हवा खेळती नसते अशा भागात कार्बन डाय ऑक्साइडच्या संचयनामुळे



ऑक्सिजनची कमतरता निर्माण होऊ शकते, ज्यामुळे श्वासोच्छवासाचा धोका निर्माण होऊ शकतो, असे मुंबईतील परेल येथील ग्लोबल हॉस्पिटल्सच्या अंतर्गत औषध विभागाच्या वरिष्ठ सल्लागार, डॉ. मंजुषा अग्रवाल यांनी 'द इंडियन एक्स्प्रेस'ला माहिती देताना सांगितले.छोट्या बंदिस्त ठिकाणी जिथे ड्राय आईसपासून मोठ्या प्रमाणात कार्बन डाय ऑक्साइड वायू निर्माण होतो, अशा वायूमध्ये श्वास घेतल्यास चक्कर येणे आणि श्वसनाच्या समस्या उद्भवू शकतात. हवेशीर असलेल्या ठिकाणी ड्राय आईसचा वापर करणे आणि त्वचेचा संपर्क टाळण्यासाठी उष्णतारोधक हातमोजे किंवा चिमट्याने हाताळणे महत्त्वाचे आहे, असे डॉ. गुप्ता यांनी स्पष्ट केले. शिवाय, ड्राय आईसच्या किंवा त्याच्या वाफेच्या संपर्कात आल्याने डोळ्यांची जळजळ होऊ शकते, लालसरपणा आणि अस्वस्थता दिसून येते, असे पालघरचे अधिकारी लाइफलाइन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे सल्लागार फिजिशियन डॉक्टर दीपक पाताडे यांनी स्पष्ट केले.ड्राय आईस सेवन करणे किंवा गिळणे हे तो थेट हातात पकडण्यापेक्षा जास्त धोकादायक आहे. ड्राय आईसमुळे तुमच्या तोंडातील ऊती, अन्ननलिका आणि पोट गोठू शकतात, असे हैदराबादच्या यशोदा हॉस्पिटलच्या सल्लागार फिजिशियन, डॉ. रंगा संतोष कुमार यांनी सांगितले.डॉ. कुमार म्हणाले की, सर्वात मोठा धोका तेव्हा असतो जेव्हा लोक ड्राय आईसचा वापर धूम्रपानाप्रमाणे करतात. अनेकदा काही लोक ड्राय आईस तोंडामध्ये टाकून त्याची वाफ तोंडातून बाहेर काढतात. व्यावसायिक मनोरंजन करणारे आणि शिक्षक जरी हे प्रात्यक्षिक दाखवू शकत असले, तरी ड्राय आईसचा तुकडा चुकून गिळण्याचा धोका असतो, असे डॉ. कुमार म्हणाले. आरोग्याचा धोका टाळण्यासाठी ड्राय आईसचा वापर करताना नेहमी सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करा.ड्राय आईस वापरताना सावधगिरी कशी बाळगावी? घरामध्ये ड्राय आईसचा वापर किंवा साठवणूक करताना तो हाताळण्याची योग्य पद्धत, सर्वसमावेशक संरक्षणात्मक उपाय आणि पुरेश्या प्रमाणात खेळती हवा असणे आवश्यक आहे, असे डॉ. पाताडे म्हणाले.

# 'हर्बल कॉस्मॅटिक्स'मधील करिअर

मानव संसाधन विकास मंत्रालय आणि लघुउद्योग मंत्रालयाने गेल्या काही वर्षांपासून स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी चांगल्या योजना सुरू केल्या आहेत. या दिशेने पाऊल टाकण्यासाठी अनेक प्रशिक्षण संस्थादेखील सुरू केल्या आहेत. या ठिकाणी निःशुल्क प्रशिक्षण दिले जाते. अशाच संस्थांमधून राबवण्यात येणारा एक अभ्यासक्रम म्हणजे हर्बल कॉस्मॅटिक मॅन्युफॅक्चरिंग. हर्बल कॉस्मॅटिक हे लघुउद्योगाचे उत्पादन आहे. याच्या विक्री व वितरणासाठी आणि निर्यातीसाठी सरकार अनेक प्रकारे मदत करत असते. त्याचसोबत कर्जदेखील उपलब्ध करून देते. आपण घरातच मॅन्युफॅक्चरिंग युनिट बसवून कमी गुंतवणुकीत चांगली कमाई करू शकतो.

आंतरराष्ट्रीय पातळीवरच नव्हे, तर आपल्या देशातही अलीकडच्या काळात आपल्या त्वचेच्या बाबतीत लोक बरेच संवेदनशील बनले आहेत. त्यासाठी नामांकित ब्रँडचे स्किन सेंटरदेखील सुरू झाले आहेत. या सेंटर्समध्ये सामायिक गोष्ट म्हणजे सर्वांना हर्बल कॉस्मॅटिक्स हवे असतात. हर्बल कॉस्मॅटिकचा मूळ आधार म्हणजे औषधी वनस्पती होय. यामध्ये कुठल्याही प्रकारची रसायने नसतात. याच्या वापरामुळे त्वचा खराब होण्याची भीती नसते आणि त्यापासून रिॲक्शन येण्याचीही शक्यता नसते. भारतामध्ये औषधी वनस्पती मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. म्हणूनच येथे हर्बल कॉस्मॅटिकचे उत्पादन तुलनेने सोपे आणि कमी गुंतवणुकीत करणे शक्य आहे.



मॅन्युफॅक्चरिंग युनिट बसवण्यासाठीचा खर्च : आधीच सांगितल्याप्रमाणे हर्बल कॉस्मॅटिक्स उत्पादनासाठी औषधी वनस्पती आवश्यक असतात. यामध्ये चंदन, हळद, तुळस, कडुनिंब, कोरफड, नारळाचे तेल, लवंग इत्यादींचा उपयोग केला जातो. या कच्च्या मालासोबत भांडी गरम करण्यासाठी गॅस आणि एका खोलीची गरज असते. यामध्ये एक युनिट बसवता येते. या सर्व गोष्टींसाठी जवळपास लाखभर रुपयांपर्यंत खर्च येतो. आपल्याकडे स्वतःची जागा आहे की नाही, यावर हा खर्च अवलंबून असतो. तसेच किती मोठ्या प्रमाणात युनिट बसवणार आहोत, त्यावरही खर्च अवलंबून असतो. कारण मोठे युनिट बसवल्यास कर्मचारी ठेवण्यासाठी खर्च अधिक वाढू शकतो. म्हणूनच सुरुवातीला छोट्या प्रमाणावर आपण हे उत्पादन सुरू करून जम बसल्यानंतर हळूहळू ते वाढवता येऊ शकते. कर्जसुविधा : मॅन्युफॅक्चरिंग युनिट बसवण्यासाठी खर्चाचा जवळपास ९० टक्के भाग कर्जाच्या रूपात प्राप्त करता येऊ शकतो. महिला उद्योजकांना काही योजनांमध्ये सबसिडीदेखील मिळते. हे कर्ज सार्वजनिक क्षेत्रातील बँक, क्षेत्रीय ग्रामीण बँक आणि केंद्र व राज्य सरकारच्या वित्तसंस्था देतात. कर्ज घेण्याची औपचारिकता पूर्ण करण्यापूर्वी सर्व प्रकारची कागदपत्रे जमा करून ठेवावीत. म्हणजे कर्ज मिळण्याच्या प्रक्रियेस अधिक विलंब होणार नाही आणि काम त्वरित सुरू होईल.

हर्बल मॅन्युफॅक्चरिंगमध्ये साबण, क्रीम, तेल आणि शॅम्पू याव्यतिरिक्तदेखील बरीच उत्पादने तयार करता येऊ शकतात. या उत्पादनांमध्ये केवळ औषधी वनस्पतींचाच वापर केला जातो. काही वेळा ॲलोपॅथी घटकदेखील यामध्ये वापरले जातात. नवेनवे उत्पादन बनवण्यामध्ये अधिक लाभ मिळू शकतो. कारण अलीकडच्या काळात हर्बल उत्पादने खरेदी करण्याकडे लोक अधिक आकृष्ट होत आहेत. हर्बल शाम्पू मेकिंग : अलीकडच्या काळात शाम्पूचा वापर अगदी सामान्य झाला आहे. शाम्पू वापरल्यामुळे केस मुलायम आणि चमकदार बनतात. व्यावसायिक दृष्टीने ही गोष्ट अतिशय लाभदायक आहे आणि त्यामुळे त्याला असणारी मागणीदेखील अधिक आहे. शाम्पू बनवण्यासाठी नारळाचे तेल, कॉस्टिक पोटॅश, डिस्टिल्ड वॉटर, पोटॅशियम कार्बोनेट आणि सुगंधित पदार्थ यांचा वापर केला जातो. देशामध्ये कॉस्मॅटिक मॅन्युफॅक्चरिंगचे प्रशिक्षण देणार्या अनेक संस्था आहेत. प्रशिक्षणाचा अवधी साधारण एक महिना असतो. यासाठी वयाची मर्यादा आणि इतर शैक्षणिक पात्रता फारशी बघितली जात नाही.

# सृष्टीचे पालनहार देवादी देव महादेव!

भोले शंकर संपूर्ण सृष्टीचे व हिंदू धर्माचे तारणहार दैवत आहे. असे सांगण्यात येते की संपूर्ण ब्रम्हांडामध्ये ३३ कोटी देवी–देवतांचा वास आहे.परंतु यात सर्वांचे पालनहार देवादी देव महादेव म्हणजेच शिव–पार्वती आहे. त्यामुळे शंकरजीला भोल्या शंकरा म्हटल्या जाते. समुद्र मंथनाच्या वेळेस जे विष निघाले ते शंकरजीनी प्राशन करून संपूर्ण सृष्टीला वाचवीले व विष प्राशन केल्याने त्यांचा कंठ निळा झाला. शंकराचा वास सर्वसाधारण ठिकाणापासून तर स्मशान भूमीपर्यंत दिसून येतो.म्हणजेच आकार –पाताळ–पुर्व–पश्चिम–उत्तर–दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला कोणत्या ना कोणत्या रूपात भगवान शंकरजींचे दर्शन अवश्य होते. त्यामुळेच हिंदुमान्यतेनुसार शंकराच्या मुर्तीची किंवा पिंडाची पुजा केली जाते.भोले शंभर सर्वसामान्यांचेच देवता नसुन मानव–देव–दानव–किन्नर सर्वांचे आराध्य दैवत आहे.त्यामुळे आजही नागव्दार,महादेव,पचमडी इत्यादी अनेक ठिकाणी हजारोंच्या संख्येने भाविक दरवर्षी महादेवाच्या दर्शनाला जातात व भोल्या शंकराचे दर्शन घेऊन आपली मनोकामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. रावनासारखा महाग्यानी घोर राजनितीज्ञ हा सुद्धा शंकरजीचा कट्टर भक्त होता. रावणाची भक्ती पाहून त्यांना वर्दानसुध्दा दीले होते. त्यामुळे शंकरजीची पुजा सर्वांनाच करण्याचा अधिकार आहे.कारण शंकरजींची महीमा अपरंपार आहे.याच उद्देशाने शंकरजींनी आपले वास्तव्य सर्वसामान्यांपासून तर स्मशान भुमीपर्यंत अजरामर ठेवले आहे.आज स्थल,जल,वायु, आकाश–पाताळ, पुर्व–पश्चिम, उत्तर–दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला भोले शंकराचे दर्शन होते.आज आपण नद्यांचा उगम पहातो तो उगम शंकरजींच्या जटेतुन झाल्याचे अनेक कथा व पुराणात पहातो. कोणी मानो अथवा न मानो परंतु आपण या पृथ्वीतलावर हसतो,खेळतो,बागडतो यांचे मुख्य कारण म्हणजे या ब्रम्हांडातील देवी–देवतांचा वासच आहे. कोणतीही देवी–देवता असो त्यांचे स्मरण केल्याने मानसाच्या ह्रदयात व मनात एक उत्सहाचे वातावरण निर्माण होते. कोणताही देव दीसत नसला तरी मनात असला पाहिजे व संपूर्ण शक्ती सत्कर्मासाठी समर्पीत केली पाहिजे.आज संपूर्ण निसर्ग जो आपल्याला दिसतो त्यात लाखोंच्या संख्येने अनेक वृक्ष, फुले,फळे दिसून येते ही संपूर्ण ईश्वरी देनच आहे.परंतु संपूर्ण निसर्गाची रक्षा करने मानवजातीचे प्रथम कर्तव्य आहे.आपण सत्कर्माचा मार्ग अवलंबवीला तर देवादी देव महादेव आपणापर्यंत अवश्य येईल. महाशिवरात्री हा हिंदू धर्माचा पवित्र सन आहे.त्यामुळे महाशिवरात्री हा सन मोठ्या भक्तिभावाने सर्वत्र साजरा केल्या जातो. त्यामुळे आपल्याला सर्वत्र उत्सहाचे व मंगलमय वातावरण दिसून येते.महाशिरात्रीला बेलपत्ती,गोंगलाचे फुले याला जास्त महत्व असते. म्हणजे पृथ्वीतलावरील प्रत्येक झाडाला, फळांना किंवा फुलांना आगळेवेगळे महत्व असते हे आपल्याला दिसुन येते.महादेवाचे गुणगान गाण्यांच्या स्वरूपात आपल्याला ऐकायला व पहायला मिळते. संपुर्ण भारतात १२ ज्योतिर्लिंग आहेत त्यापैकी ५ महाराष्ट्रात आहे.त्र्यंबकेश्वर, परळी बैजनाथ, भिमाशंकर, औंढा नागनाथ, घृष्णेश्वर ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवशाली बाब आहे.या व्यतीरीक्त महाराष्ट्रासह भारतात भगवान शंकरजीचे अनेक मंदिरे आहेत.यावरून स्पष्ट होते की भगवान शंकरजीवर सर्वांचीच आस्था आहे.त्याच प्रमाणे ॐ नमो: शिवाय ,ॐ शांती,हर हर महादेव इत्यादींचा जप केल्याने मन प्रसन्न रहाते व शांती मिळते व अनेक आजार दुर होण्यास मोठी मदत मिळते. आपण भोले शंकराचा जयघोष शिवकालीन इतिहासामध्ये सुध्दा ऐकली व पहाली आहे.शिवाजी महाराज व मावळे लढाईवर जातांना हर हर महादेवचा जयघोष करीत असे.यामुळे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण होवून एक नवीन उर्जा निर्माण होत होती.त्याचप्रमाणे आजही आपल्याला प्रत्येक शंकरजींच्या मंदिरात भाविकांचा हर हर महादेव चा जयघोष ऐकायला मिळतो.यामुळे सर्वांचेच मन प्रसन्न होते व नवीन ऊर्जा निर्माण होते.याचे मुख्य कारण म्हणजे देवादी देव महादेव हे सर्वांचेच पालनहार दैवत आहे.महाशिवरात्रीच्या सणाला भावीक मोठ्या उत्साहाने उपवास ठेवतात यामागचा एकच उद्देश असतो की हे देवादी देव महादेव येणारे विघ्न टळुदे व सुख–शांती प्रदान कर. कारण आपण सुखी तर देश सुखी, देश सुखी तर संपूर्ण सृष्टी सुखी.महाशिवरात्रीच्या निमित्ताने मी हेच सांगु इच्छितो की स्थल,जल,वायु व निसर्ग याची जोपासना मानवजातीने वेळोवेळी केलीच पाहिजे.आज वाढते प्रदुषण, जंगलातील हिंसक पशु शहरात प्रवेश करने, जंगलाला वनवे लागने,हिमकडा कोसळुन महाप्रलय येने,भुकंप याला रोखण्यासाठी संपूर्ण मानवजातीने निसर्गाची जोपासना केलीच पाहिजे.अन्यथा देवादी देव महादेव विक्राळ रूप सुध्दा धारण करू शकते.याला नाकारता येत नाही.याचे अनेक उदाहरणे आपल्या समोर आहे.आपण निसर्गाची निर्मळ मनाने सेवा व जोपासना केली तर देवांदी देव महादेव अवश्य प्रसन्न होतील.यात दुमत नाही.देशात महाप्रलय,भुकंप,अती उष्णता,अती थंडी, सुनामी,वनवा लागणे, प्रदुषणात वाढ होणे या संपूर्ण गोष्टी निसर्गावर होत असलेल्या अन्यायामुळे दिसून येते.देवादी देव महादेवाचा वास दऱ्या–खोऱ्यात,पहाडात, जंगलात, निसर्गानच्या काणा–कोटऱ्यात व कणाकणात आपल्याला पहायला मिळतो.त्यामुळे महाशिवरात्रीच्या सनाच्या निमित्ताने निसर्गाची जोपासना करण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे व निसर्ग संपदा विनाशापासुन वाचविली पाहिजे.महाशिवरात्रीच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.कारण प्रत्येक वृक्षाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला भोले शंकराचे दर्शन अवश्य होईल.त्याचबरोबर वृक्ष लागवडीमुळे गुरांना चारा, मानवाला शुद्ध हवा व सर्वांनाच शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. महाशिवरात्रिच्या निमित्ताने जर वृक्षलागवड झाली तर देशात एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड सहज होईल व निसर्ग प्रफुल्लित होण्यास मोठी मदत मिळेल.हर हर महादेव!

***************

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## मद्यप्रेमींनो सांभाळा! कोणताच ब्रँड सेफ नाही, मद्यपानामुळे महिन्याला दगावतात ४० जण

यकृत खराब होण्याचे मुख्य कारण म्हणजे अती मद्यसेवन असून मेडिकल, मेयो आणि एम्समध्ये रोज दहा मद्यपी रुग्णांना गंभीर अवस्थेत दाखल करण्यात येते. महिनाभराच्या उपचारात यकृतासह इतर अवयवांमध्ये गुंतागुंत वाढून या रुग्णालयांत ४० जण दगावत असल्याची माहिती पुढे आली आहे.प्रारंभी मद्यपान आनंददायी वाटते. परंतु, हळूहळू व्यक्ती व्यसनात अडकते. मद्याबाबत ब्रँडला ''सेफ'' अर्थात सुरक्षित असल्याचा समज करून घेतला जातो. यामुळे व्यसन करणाऱ्यांचे सरासरी वयही कमी होत आहे. चाळीशीत या समस्येची तीव्रता वाढली आहे. मेडिकल, मेयो, एम्स या तिन्ही रुग्णालयात रोज गंभीर अवस्थेत अतिमद्यपान करणारे सुमारे १० रुग्ण दाखल होतात. उपचारानंतर काही बरे होतात. डॉक्टरांकडून त्यांचे समुपदेशन होते. पुन्हा मद्यपान केल्यास जिवाला धोका असल्याचे सांगण्यात येते. पण ९० टक्के व्यक्ती अतिमद्यपान सुरू ठेवतात. नंतर पुन्हा– पुन्हा रुग्णालयात दाखल होतात. अतिमद्यपानाने अनेकांना लिव्हर सिरॉसिस होतो. यात यकृताचे विघटन होऊन ते घट्ट होते. दारूचे परिणाम शरीराची नैसर्गिक प्रतिकारशक्ती कमी होते, मद्यपानामुळे रक्तदाब वाढतो, ह्रदयविकार, स्ट्रोकची शक्यता,पचनसंस्थेच्या समस्या, रक्ताच्या उलट्या होतात, यकृताचे आजार वाढतात, मानसिक आरोग्यावर परिणाम, यकृतावर सूज येते, थकवा वाढतो, वजन कमी होणे, भूक न लागणे, मळमळ किंवा उलट्या, पोटात समस्या उदभवते अतिमद्यपानामुळे काय होते ? मद्यपानामुळे यकृत बहुतांशवेळा खराब, निकामी झालेले असते. त्याची जागा तंतू घेतात. यकृत कडक होते त्याचा आकारही अगदी लहान होतो. पूर्वी लिव्हर सिरॉसिस अतिमद्यपान करणाऱ्या व्यक्तीमध्येच आढळायचे. मेडिकल, मेयो एम्समधील एकूण लिव्हर सिरॉसिसच्या रुग्णांपैकी ७० ते ७५ टक्के रुग्णांचा इतिहास अतिमद्यपानाचा असतो.दारूचा कोणताही ब्रँड ''सेफ'' नाही. थोडंसेच मद्यपान करतो असाही विचार करू नका. तरुणींनी, गर्भवतींनी मद्याचा प्याला घेतला तर बाळाच्या शरीरात व्यंग निर्माण होण्याची, मतीमंदत्वाची वा आक्रमक वृत्ती येण्याची शक्यता असते. जितके जास्त मद्य सेवन, तितके बाळाचे नुकसान होते. गर्भपाताची शक्यता, वेळेपूर्वीच बाळ जन्माचा धोका असतो. यामुळे महिलांनी व्यसनापासून परावृत्त झाले पाहिजे.–डॉ. सुषमा देशमुख, ज्येष्ठ स्त्री व प्रसूतीरोग तज्ज्ञ, नागपूर.

# जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला लातूर तहसीलने परित्यक्तेला अन्न सुरक्षेसह रेशनकार्ड देवून केला सन्मान

लातूर :- गेली अठरा वर्षांपासून एका मुलीसह परित्यक्तेचे जीवन गुजारा करणार्या पद्मीण धरम देशमाने (सिध्दार्थ सोसायटी,लातूर)या महिलेला जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला तहसीलदार सौदागर तांदळे यांनी तात्काळ अन्न सुरक्षेसह रेशनकार्ड देवून खर्या अर्थाने महिलांचा सन्मान करुन जगण्याला उभारी दिल्याबद्दल लाभार्थीसह कार्यकर्त्यांनी तहसील प्रशासनाचे आभार मानले आहेत.

पद्मीण धरम देशमाने या परित्यक्ता महिलेस गेली अठरा वर्षांपासून स्वतंत्र रेशनकार्ड नाही,त्यामुळे निराधार अनुदान,अन्न सुरक्षेचा लाभ,मुलींच्या जातीचे प्रमाणपत्र आदिंसह शासनाच्या इतर योजनांचा लाभ मिळू शकत नव्हता,ही बाब दि.१ मार्च रोजी पत्रकार बाळ होळीकर कळल्याने त्यांनी तहसीलदार सौदागर तांदळे,पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार गणेश अंबर,लिपीक विठ्ठल काळे यांना अवगत करुन सदर महिलेला अन्नसुरेक्षसह रेशनकार्ड देण्याची विनंती केली.त्यावर तात्काळ त्यांनी त्या महिलेच्या मुलीसह अन्न सुरक्षेच्या लाभाचे रेशनकार्ड पुरवठा विभागास तयार करण्याचे निर्देश देवून लागलीच आज गुरुवार,दि.७ मार्च २०२४ या जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला तहसीलदार



सौदागर तांदळे व संगांनियोअ समितीचे लातूर शहराध्यक्ष शिवसिंह सिसोदिया यांच्या हस्ते या महिलेला रेशनकार्ड प्रक्रिया पूर्ण केल्याची कागदपत्रे तहसीलमध्ये प्रदान करण्यात आली.

यावेळी बोलताना तहसीलदार तांदळे यांनी तहसील प्रशासन नेहमीच उपेक्षित घटकांच्या सोबत असल्याचे सांगून,सदर महिलेला अन्न सुरक्षेसह,रेशनकार्ड देत,निराधार अनुदान देण्याची घोषणा करुन जागतिक महिला दिनाच्या कृतीशील शुभेच्छा दिल्या. तर संगांनियो समितीचे अध्यक्ष सिसोदिया यांनी महिलेस निराधार अनुदान मंजूर करण्याचा शब्द दिला.तर होळीकर यांनी तहसील प्रशासनाने वेगवान कार्यपध्दती या निमित्ताने दाखवून महिलांचा उचित सन्मान केल्याबद्दल धन्यवाद दिले. यावेळी संगांनियो शहराचे अव्वल कारकून नारायण शिंदे,पुरवठा विभागाचे कृष्णा जटाळ तसेच आशिष आल्टे,देवानंद बनसोडे,रास्त भाव दुकान संघटनेचे किशोर गायकवाड,लातूर शहर पूर्व कृती समितीचे बाबासाहेब बनसोडे, रिपाइं नेते हरिष कांबळे,राष्ट्रसेवा दलाचे पांडुरंग देडे,ऍड. शिवकुमार स्वामी,रास्त दुकानदार महावीर शेळके,पत्रकार नितीन चालक,कांताबाई मस्के आदि उपस्थित होते.

## राष्ट्रवादी सामजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्षपदी समीर जानवलकर यांची नेमणूक



चिपळूण (प्रतिनिधी) : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार व प्रांताध्यक्ष सुनिल तटकरे यांचे आदेशाने तसेच आमदार शेखर निकम यांचे माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागचे प्रदेश अध्यक्ष सुनिल मगरे यांनी पत्र देऊन होतकरू व रोहिदास समाजाचे कार्यकर्ते समीर रमेश जानवलकर रत्नागिरी जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. आमदार शेखर निकम यांचे वाढदिवसाचे औचित्य साधून आ. निकम व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा अध्यक्ष बाबाजी जाधव यांचे हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. समीर जानवलकर हे चिपळूण अर्बन बँकचे संचालक, तसेच चिपळूण बचाव समितीचे माध्यमातून चिपळूणमधील नद्याचा गाळ काढण्याचे काम २९ दिवस सक्रीय आंदोलन सहभाग घेऊन आंदोलन यशस्वी करून नाम फाउंडेशन कोकण समन्वयकचे माध्यमातून रत्नागिरी जिल्हातून व कोकणातून ग्रामीण भागात मोठे कार्य करत आहेत. चिपळूण मधील २०२१ चे पुरपरिस्थीत शिव व वाशिष्ठी नदी गाळ उपसा करण्यामध्ये त्यांचे महत्वपूर्ण योगदान असून, राजापूर, रत्नागिरी, महाड संपूर्ण कोकणातून ग्रामीण भागात काम केले.

## पश्चिम बंगाल येथील संदेशखली भागातील महिला वरती होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात अभाविपची निदर्शने

लातूर / प्रतिनिधी :- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूर महानगराच्या वतीने पश्चिम बंगाल येथील संदेशखली भागातील महिला वरती होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात लातूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे निदर्शने करून निषेध व्यक्त करणार आला.

१० फेब्रुवारी २०२४ रोजी पश्चिम बंगालचे राज्यपाल आनंद बोस यांच्या संदेशखली भेटीमुळे या भीषण शोषणाचे सत्य व्यापक जनतेसमोर आले. पश्चिम बंगालमध्ये, सत्ताधारी पक्षाचे नेते हिंदू घरातील अल्पवयीन मुली आणि महिलांना जबरदस्तीने,भीतीपोटी त्यांचे अपहरण करतात आणि त्यांना तृणमूल काँग्रेसच्या कार्यालयात आणतात आणि अत्याचार करतात असे अनेक घृणास्पद प्रकरणे उघडकीस आली आहेत.बहुतांश पीडित महिला अत्यंत मागासलेल्या आणि अनुसूचित जातीतील आहेत आणि त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराला कंटाळून अनेक कुटुंबांना संदेशखलीतून पळून जावे लागले आहे. पश्चिम बंगाल राज्याच्या महिला मुख्यमंत्र्यांच्या आश्रयाने वर्षानुवर्षे होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक शोषणाला कंटाळलेल्या संदेशखळी येथील हजारो महिला आज राज्य सरकारच्या विरोधात आंदोलन करत आहेत. मुख्यमंत्र्यांच्या आश्रयाने राज्यातील सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून संदेशखलीतील महिलांचे शोषण होत असताना आणि योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात राज्य पोलीस अपयशी ठरले आहेत; त्यामुळे या




महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी अभाविप संपूर्ण देशभर निदर्शने करून जिल्हाधिकऱ्यांमार्फत राष्ट्रपतीना निवेदन देण्यात येत आहे. राज्य सरकारचा सहभाग लक्षात घेऊन संपूर्ण संदेशखळी घटनेची उच्चस्तरीय चौकशी केंद्रीय यंत्रणांकडून करण्यात यावी आणि तात्काळ कारवाई करण्यात यावी, संदेशखलीतील महिलांवरील अत्याचार आणि त्यांच्या सामूहिक अस्मितेचे उल्लंघन याला तत्काळ आळा घालण्यात यावा, महिलांवरील हिंसाचार आणि अत्याचाराच्या घटनांचे वास्तव सरकार, प्रशासन आणि न्यायिक संस्थांपर्यंत निर्भयपणे पोहोचवण्यासाठी हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध करून द्यावा, न्यायाचा सोयीसाठी, पीडित महिलांना मोफत कायदेशीर मदत दिली जावी, या महिलांना मानसोपचार तज्ज्ञांद्वारे समुपदेशन सत्रांची सुविधा देखील प्रदान केली जावी जेणेकरुन अनेक वर्षांच्या मानसिक अत्याचारातून हळूहळू बरे व्हावे. अशी मागणी यावेळी करण्यात आले. यावेळी महानगरमंत्री सुशांत एकोर्गे यांनी असे म्हणाले की गेल्या अनेक वर्षांपासून पश्चिम बंगालमधील उत्तर चोवीस परगणा जिल्ह्यातील संदेशखली भागातील महिलांचे लैंगिक शोषण केले जात आहे, त्यांच्या सामूहिक अस्मितेचे उल्लंघन केले जात आहे आणि त्यांच्या कुटुंबीयांवर राज्याचे संरक्षण असलेल्या गुन्हेगारांकडून पद्धतशीरपणे अत्याचार केले जात आहेत, ममता सरकार या गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचा काम करत आहे. सरकार माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या संदेशहीन घटनेने अभाविप दुखावले असून त्याचा तीव्र निषेध करते. अशी भावना यावेळी बोलताना व्यक्त केली.

यावेळी वैष्णवी शिंदे , तेजुमई राऊत ,अनुजा चामे ,प्रणव कोळी,अजय ठाकूर, केदार मोरगे, सुजित भोसले,पार्थ पिनाटे,नरेंद्रप्रतापसिंह ठाकूर, अवि गजभारे, योगेश कोलबुदे,बालाजी हट्ट,प्राप्ती बाबर,दिपाली कोडबले व ईतर कार्यकर्ते उपस्थित होते

# अर्थसंकल्पातून वडार समाज उपेक्षितच..

## दिलेल्या अश्वासनांची पूर्तता होणार का? वडार समाज संघाची मागणी

लातूर / प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे २०२४-२५ चे अंतरिम अर्थसंकल्प वित्त मंत्री यांनी विधानसभेत दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी सादर केले. परत एकदा या अर्थसंकल्पातून वडार समाजाची निराशाच झाली आहे. वडार समाजाला दिलेल्या अश्वासनांचा सरकारला विसर पडला आहे, हेच यातून दिसून आले. या शिवाय नवीन असे काही नाही. हे बजेट शोषित, वंचित समाजाला वंचित ठेवणारे आहे. बजेटचे हळसहीं श्रळसहीं पाहिले तर हे बजेट निराशाजनक असल्याचे लक्षात येईल. त्यात वडार समाज कुठेच नाही. असे सामाजिक कार्यकर्ते भटक्या-विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ,महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी प्रसिद्धीपत्रक निवेदनाद्वारे केले आहे.

वर्ष २०२३-२४ च्या बजेटमध्ये
१.वडार जमातीच्या उन्नतीसाठी वडार आर्थिक विकास महामंडाळाची घोषणा केली होती. उपलब्धी काय?
२.याच्या आधी वडार जमातीच्या ११ मागण्यांच्या अधिसूचनांच्या घोषणेची पूर्तता झाली का?
३. वडार जमातीच्या आर्थिक उन्नतीसाठी ५० कोटींची घोषणा केली होती. यावर काय झाले आणि किती निधी खर्च झाला?
४.उद्योग-व्यवसाय करण्यासाठी कर्जाची उपलब्धी निधीबाबत घोषणा केली होती, याचे पुढे काय झाले?

..जवळपास अनेक प्रकारच्या महत्वाच्या घोषणा मागील वर्षीच्या आणि महामेळाव्यातील घोषणा आदी बजेट मध्ये पूर्ण होईल असे वाटले होते. सरकारने दिलेल्या अश्वासनांची या ठिकाणी त्या प्रत्येक घोषणे बाबत केलेल्या कामाची माहिती सरकारने देणे क्रमप्राप्त आहे. नाहीतर घोषणा हवेतच राहतील, मिळणार काही नाही. ज्याअर्थी घोषणा केल्यात तेव्हा काही तर नक्कीच झाले असणार, पण पुढे त्याचे काय झाले? याचे कोणालाच काही सोयरसूतक नसल्याचे परत एकदा दिसून आले. वर्ष २०२३-२४ चे विकास खर्चाचे बजेट - प्लॅन बजेट १,७०,००० कोटीचे होते. यापैकी खर्च किती? या बजेटमध्ये वडार जमातीच्या आर्थिक विकासासाठी ५० कोटी आणि महामेळाव्यामध्ये (२०१८) ५० कोटींची घोषणा केली होती. यापैकी किती खर्च ,कोणत्या योजनांवर व लाभ किती लोकांना मिळाला हे सरकारने सांगावे. यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये पहिल्यांदा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून केवळ ५ कोटींची घोषणा करून केवळ बोळवण करण्याचे काम सरकार करू पाहते आहे का? हाही या ठिकाणी प्रश्नचिन्ह आहे. कारण आचारसंहिता आठ ते दहा दिवसात लागण्याची शक्यता आहे. त्यापार्श्वभूमीवर दिलेल्या ५ कोटीचे गणित कसे लागणार? हा ही याठिकाणी विचार करावा लागणार. हे ५ कोटी मिळणार? का परत एकदा वेळ मारून नेण्याचा हेतू आहे. हा ही आता चिंतनशील प्रश्न बनला आहे. वर्ष २०२४-२५ मध्ये वडार जमातीसाठी अर्थसंकल्पामध्ये आवश्यक निधी तरतूद १५०



कोटी पाहिजे, दिले ५ कोटी,नाकारले १४५ कोटी. यातून सरकार वडार जमातीबाबत सकारात्मक आहे का? हाच प्रश्न निर्माण होतो. बजेट मुळातच लोक कल्याणाचे, विकासाचे असते. त्यातही मूलभूत सुविधा, मूलभूत गरजा भागविणे, उपजीविका, रोजगार, शिक्षण, आरोग्य, कामगार कार्यालयाचा वाटा किती?, घरकुल मंजूर होतात किती? यावर भर देणे आवश्यक असते. संविधानाच्या अनुच्छेद २१ व ४६ चे उद्देश पूर्तीसाठी बजेटची रचना पाहिजे. समाजातील शोषित वंचित, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक दुर्बल घटक, युवा, महिला, शेतमजूर , शेतकरी, हा वर्ग नजरेसमोर ठेवून बजेट तयार व्हायला पाहिजे. मात्र, नेहमीच्या काही पॉप्युलर घोषणा वगळता, बजेटची तरतूद मोठ्याप्रमाणात ळपषीर्रीीलीीश वर खर्च होताना दिसते. मागील बजेटचे हळसहश्रळसहीं मध्ये उल्लेख आहे. वर्ष २०२२-२३ च्या बजेटचे घोषवाक्य होते पंचसूत्री आणि २०२३-२५ चे होते पंचामृत. वर्ष २०२४-२५ च्या बजेट मध्ये युवा, महिला, गरीब, शेतकरी, कामगार,घरकूल या शब्दांचा वापर करण्यात आला. मात्र यांच्यासाठी विशेष योजना भरीव तरतुदीसह घोषित झाल्या नाहीत. ओबीसी व अल्पसंख्याकांसाठी ५१८० कोटींची तरतूद आहे. अतिअल्प तरतूद केली आहे. यावर बोलण्याची गरज आहे.

ओबीसी, भटके- विमुक्त यांच्यासाठी बजेट वाटपाचे धोरण निश्चित करण्याची गरज आहे. तसेच वडार जमातीच्या बजेटचा कायदा झाला पाहिजे. यावर वडार जमातीच्या वतीने वारंवार सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न झाला मात्र, वडार समाजहिताच्या योजनेकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे. वडार जमातीला दिलेल्या अश्वासनांचं काय झाले? का केवळ निवडणुकीच्या तोंडावर मतांचे गणित जुळवण्यासाठी हे सारे काही होतेय काय? असे सामाजिक कार्यकर्ते भटक्या-विमुक्त समूहाचे अभ्यासक तथा वडार समाज संघ,महाराष्ट्र राज्य प्रदेश कार्याध्यक्ष श्रीकांत मुद्दे यांनी निवेदनाद्वारे केले आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त आज सायकल रॅली



लातूर : प्रतिनिधी जागतिक महिला दिनानिमित्त स्त्रीभ्रूण हत्याविरोधी, सुरक्षित मातृत्व व महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, लातूर व वुमन्स डॉक्टर विंग, लातूर यांच्या वतीने आज दि. ८ मार्च रोजी सकाळी ६.३० वाजता महिलांकरिता सायकल रॅली आयोजित करण्यात आली आहे.शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क-पीव्हीआर चौक-महात्मा गांधी चौक ते डॉ आंबेडकर पार्क असा सायकल रॅलीचा मार्ग आहे. या सायकल रॅलीचा शुभारंभ जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या शुभहस्ते व पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, आरोग्य उपसंचालक डॉ. अर्चना भोसले, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.उदय मोहिते, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हणमंत वडगावे, डॉ. अनिल राठी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या सायकल रॅलीत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय लातूर व वुमन्स डॉक्टर विंग लातूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## देशातील तरुणांना राहुल गांधींची ५ आश्वासने

नवी दिल्ली : निवडणूक जवळ आल्यावर राजकीय पक्षांकडून मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध आश्वासने दिली जातात. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान देशातील तरुणांना उद्देशून मोठ्या घोषणा केल्या आहेत. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी गुरुवार दि. ७ मार्च रोजी राहुल गांधींच्या पाच आश्वासनांची यादी सोशल मीडियावर शेअर केली.राहुल गांधी म्हणाले की काँग्रेस सत्तेत आल्यानंतर पहिले पाऊल म्हणजे, भारतात ३० लाख सरकारी जागा रिक्त आहेत. पीएम मोदी त्या जागा भरुन काढणार नाहीत. आमचे सरकार आल्यानंतर आम्ही त्या ३० लाख सरकारी नोक-या देण्याचे काम करू. ते पुढे म्हणाले की, दुसरी गोष्ट म्हणजे मनरेगाचे अधिकार आम्ही दिले होते. त्याचप्रमाणे आम्ही भारतातील सर्व तरुणांना शिकाऊ अप्रेंटिसशिपचा अधिकार देणार आहोत. प्रत्येक पदवीधर तरुणाला हा अधिकार मिळेल. कॉलेज डिप्लोमानंतर प्रत्येक पदवीधराला सरकारी कार्यालय आणि खासगी कंपनीत एक वर्षाची अप्रेंटिसशिप आणि त्यासोबत एक लाख रुपये दिले जातील. कॉलेज पूर्ण केल्यानंतर तात्काळ हा हक्क मनरेगाच्या हक्कासारखा मिळेल.कोणती आहेत काँग्रेसची आश्वासने? १. भरतीचे आश्वासन : सत्ता आल्यानंतर काँग्रेस पक्ष केंद्रात ३० लाख नोक-या देणार. आम्ही एक कॅलेंडर जारी करू आणि त्यानुसार भरती प्रक्रिया कालबद्ध पद्धतीने पूर्ण करू. २. पहिली नोकरी पक्की : प्रत्येक डिप्लोमा किंवा पदवीधरांना सार्वजनिक किंवा खासगी क्षेत्रातील कंपनीत एक वर्ष अप्रेंटसशिप दिली जाईल. यासोबतच, १ लाख रुपये (८५००/महिना) मिळेल. ३. पेपर लीकपासून स्वातंत्र्य : सार्वजनिक परीक्षांमध्ये पेपर लीक टाळण्यासाठी आणि निष्पक्ष परीक्षा घेण्यासाठी नवीन कायदा केला जाईल. याद्वारे कोट्यवधी तरुणांचे भविष्य उद्धस्त होण्यापासून रोखले जाईल.४. गिग इकॉनॉमीमधील सामाजिक सुरक्षा : काँग्रेस गिग इकॉनॉमीमध्ये दरवर्षी रोजगार शोधणा-या लाखो तरुणांसाठी चांगल्या कामाची परिस्थिती आणि सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी कायदा आणला जाईल.५. युवा रोशनी : काँग्रेस पाच वर्षांच्या कालावधीसाठी देशातील सर्व जिल्ह्यांसाठी ५,००० कोटी रुपयांचा निधी तयार करेल. ४० वर्षांपेक्षा कमी वयाचे तरुण कोणत्याही क्षेत्रातील त्यांच्या स्टार्ट-अपसाठी हा निधी मिळवण्यास पात्र असतील.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE